३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : gacell.dte@gmail.com
Website: http://www.dte.org.in

क्रमांकः १७/क्युएसेल/२०११/ ९८

प्रति,

9 मई MAY 2011

सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती

विषय:- प्राचार्य व सहसंचालक यांच्या कार्याच्या प्रगतीच्या आढाव्याबाबत.

महोदय,

आपणांस अवगतच आहे की, तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीकोनातून प्रगती पथावर पाऊले उचलली जात आहेत. या अनुषंगाने शासकीय व शासकीय अनुदानित संस्थांच्या व विभागीय कार्यालयाच्या प्रगतीचा आढावा प्रत्येक तीन महिन्यांनी घेण्याचे ठरविले आहे.

प्राचार्यांसाठी हया आढाव्याचा अहवाल दोन भागांमध्ये अनुक्रमे शैक्षणिक व संस्थेची प्रगती आणि प्रशासकीय व आर्थिक यामध्ये विभागलेला आहे. शैक्षणिक प्रगतीमध्ये मुख्यत्वे करुन अ‍ॅक्रिडिटेशन, प्रोफेशनल रिझल्टस विद्यार्थ्यांचे निकाल व आस्थापना उद्योगसमुहाशी समन्वय, शिक्षकांचे प्रशिक्षण, सर्व्हिस टू कम्युनिटी इत्यादी कि परफॉर्मन्स इंडिकेटरचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रशासकीय व आर्थिक अहवालामध्ये मुख्यत्वे करुन माहिती जतन करण्याची कार्यपध्दती, आस्थापना विषयक मुद्दे तसेच संस्थेच्या इमारत बांधणी, इक्युपमेंट, लायब्ररी इत्यादींबाबत मिळालेले पैसे व खर्च याबाबत भर दिलेला आहे.

प्रत्येक विभागीय कार्यालयाच्या सहसंचालक पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सांभाळत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा मुख्यत्वे करुन प्रशासकीय, आर्थिक व शैक्षणिक या तीन भागांमध्ये विभागलेला आहे.

सदर आढावा प्रथमच होत असल्यामुळे आपणांस असे सूचित करण्यात येते की, एप्रिल २०१० ते मार्च २०११ या आर्थिक वर्षामधील आपल्या विभागाचा आढावा व आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या शासकीय व शासकीय अनुदानित संस्थांच्या प्राचार्यांच्या कार्याबाबतचा आढावा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात भरुन या संचालनालयास दिनांक ३०/५/२०११ पर्यंत पाठविण्यात यावा. तसेच सॉफटकॉपी gaspfu@gmail.com या ई-मेल वर पाठविण्यात यावी. तदनंतर प्रत्येक तीन महिन्यांनी म्हणजेच एप्रिल ते जून, जुलै ते सप्टेंबर, ऑक्टोबर ते डिसेंबर व जानेवारी ते मार्च या कालावधीमधील कार्याच्या आढाव्याबाबतची माहिती टप्प्याटप्प्याने पाठवावी.

आस्था-2

सोबत संस्था ला प्रत आवी. तदंतर संस्थांना कळवावे.

FORMAT ALREADY SEND BY E-MAIL TO ALL INSTITUTES

IF NOT RECEIVED CONTACT THIS OFFICE IMMEDIATELY

आपला

( डॉ. एस. के. महाजन )
प्र. संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

जा.क्र.- विकापु/आस्था-२/माहिती/२०११/ 8020

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे:-४११०१६.
दिनांक:- 21 MAY 2011

**कालमर्यादा - २६.५.२०११**

सोबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रासोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात माहिती भरुन या कार्यालयाच्या ropune.dte@gmail.com या ईमेलवर दिनांक २६.५.२०११ पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(बी.डी. मिसाळ)
प्रशासकीय अधिकारी
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रति:- प्राचार्य/संचालक शासकीय व अशासकीय अनुदानित सर्व संस्था.

प्रत:- १.श्री. शिंदे प्रोग्रॅमर वि. का. पुणे यांना माहितीसाठी त्यांना कळविण्यांत येते की, संदर्भाधिन पत्र,सहपत्रासह या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यांत यावे.
२.आस्था-१ यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
३. लेखा विभाग यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी
४. सर्वसाधारण विभाग यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.इ